## प्रकरण पाचवे

### दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना व आर्थिक विकासाला झालेली मदत

शेतीवर आधारित उद्योग भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत आर्थिक विकासाला उपयुक्त ठरतातच. पण हे उद्योग सहकारी तत्वावर संघटित झाले असतील तर त्यामुळे आर्थिक विकासाला आणखीनच पोषक परिस्थिती निर्माण होते. विशेषत: सहकारी साखर कारखाने ऊस उत्पादकांच्या सहकारी संघटना असल्याने या संघटनेमार्फत अनेक आर्थिक व सामाजिक उपक्रमांना गती मिळू शकते. शेतीच्या नवीन पध्दती व शेती उत्पादनाच्या दर्जात सुधारणा करता येतात, सहकारी तत्वांवर बाजार व पतपुरवठा सोयींचा विकास करता येतो. ऊस उत्पादकांचे उत्पन्न वाढल्यास हे उत्पादक सर्व थरातले असल्याने बचतीना चालना मिळते व सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे शेतीवर आधारित सहकारी उद्योगांमुळे मिळणाऱ्या लाभात त्या परिसरातील सीमांत व लहान शेतकरी सहभागी होऊ शकतात. प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ डॉ.डी.आर. गाडगीळ[१] यांच्या मते सहकार ही मूलत: उद्योग संघटना आहे. या संघटनेचे मूल्यमापन अनेक दृष्टीने करता येईल. परंतु प्रामुख्याने या संघटनेचे यश दोन निकषावर ठरवावे लागेल.

१) संघटनेचा कार्यविस्तार
२) संघटनेची आर्थिक ताकद.

सहकारी साखर कारखान्याचा कार्यविस्तार जितका वाढेल तितका कारखान्याच्या परिसराचा कायापालट होईल, कारखान्याला आर्थिक बळकटी जितकी लौकर येईल तितक्या लवकर सभासदांना लाभांश मिळू शकेल. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे मूल्यमापन या दृष्टीने करण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे.

---

१. Gokhale Institute of Politics and Economics : Writings and Speeches of Professor D.R.Gadgil on Co-operation, 1975, p.220.

१) शेतीतील बदलांचे प्रयत्न :

कोणताही साखर कारखाना मग तो खाजगी असो किंवा सहकारी असो ऊसाच्या नियमित व दर्जेदार पुरवठयावर प्रामुख्याने अवलंबून असतो. तर ऊसाचा पुरवठा उत्पादन साधने व तंत्र यावर अवलंबून असतो. यामुळे कोणत्याही विशेषत: सहकारी साखर कारखान्याने आपल्या कार्यक्षेत्रामध्ये ऊस उत्पादनाबाबत व सर्वसाधारण शेतीबाबत आधुनिक पध्दतींचा वापर करणे अपेक्षित असते. शेतीचे नवीन तंत्र फायदेशीर ठरते असा अनुभव शेतकऱ्यांना आला तर केवळ ऊस उत्पादनातच नव्हे तर एकंदर शेती व्यवसायात अमूलाग्र बदल होऊ शकतात. शेतकऱ्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. या दृष्टीने कारखान्यांने केलेल्या प्रयत्नांचा आढावा खाली घेण्यात आला आहे.

अ) ऊस पथदर्शक योजना :

साखर कारखाना उत्पादक सभासदांनी, कारखान्यामार्फत शेतीच्या नवीन तंत्राचा फायदा घ्यावा यासाठी महाराष्ट्र सरकारने १९७६-७७ पासून " ऊस पथदर्शक योजना " सुरू केली होती. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यांने आपल्या दैनंदिन गाळप क्षमतेचा व कार्यक्षेत्रातील ऊस क्षेत्राचा विचार करून महाराष्ट्र सरकारने पुरस्कृत केलेली ऊस पथदर्शक योजना १९७७-७८ पासून राबविली. योजनेत सहभागी झालेल्या उत्पादक शेतकऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे.

कोष्टक १

ऊस पथदर्शक योजना

| वर्ष | कार्यक्षेत्रातील गावांची संख्या | सभासद शेतकऱ्यांची संख्या | ऊस पथदर्शक योजनेखालील क्षेत्र एकर |
|---|---|---|---|
| १९७७-७८ | ५४ | ५१२ | ६६७ |
| १९७८-७९ | ५८ | १६३ | १०० |
| १९७९-८० | ६७ | ११५ | २३० |
| १९८०-८१ | १३० | २०० | २०० |
| १९८१-८२ | ६८ | २०० | ४३० |
| १९८२-८३ | ११० | २६० | ६१० |
| १९८३-८४ | ३५ | ४६५ | ५६५ |
| १९८४-८५ | १४२ | ९१२ | ८९९ |
| एकूण | - | २८२७ | ३७०१ |

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना १९७७-७८ ते १९८४-८५ प्रत्यक्ष मिळविलेली माहिती

दौलत सहकारी साखर कारखान्याकडून ऊस पथदर्शक योजना अंमलात आणून ऊस पथदर्शक योजनेत सहभागी झालेल्या ऊस उत्पादकांना चांगल्या प्रतीचे बियाणे, किटकनाशके, खते इत्यादींचा पुरवठा करण्यात आला होता. या योजनेतील ऊस उत्पादकांना ऊस मशागतीबाबतचे मार्गदर्शन ऊस पथदर्शक अधिकारी व कारखाना शेतीविभाग कर्मचारी यांचेकडून मिळालेले होते या योजनेत भाग घेतलेल्या उत्पादक सभासदांचे उत्पादन योजनेपूर्वी साधारणपणे दर एकरी

३७ टन होते या योजनेनंतर योजनेत भाग घेतलेल्या उत्पादक सभासदांचे उत्पादन दर एकरी ६० टन आल्याचे ` निरीक्षक सांख्यिकीय विभाग कोल्हापूर ` यांनी घेतलेल्या पाहणीत दिसून आले.[२]

तसेच ऊस सुधारणांतर्गत कारखान्याला दिलेल्या ऊस पुरवठयाच्या प्रमाणात दरवर्षी अत्यल्प दरात प्रेसमड खत वाटण्यात आले होते.

परंतु १९७७-७८ ते १९८४-८५ या कालावधीत ऊस पथदर्शक योजनेत भाग घेतलेल्या सभासद शेतक-यांची संख्या व या योजनेखालील क्षेत्रात सातत्याने वाढ झाल्याचे आढळत नाही. शिवाय एकूण उत्पादक सभासदांपैकी जेमतेम २०.८१ टक्के सभासदांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

ब) ऊसाचे सुधारित बेणे

ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी ऊसाचे सुधारित बेणे याकडेही कारखान्याने लक्ष दिले. परंपरागत बेणे वापरल्यास दर हेक्टरी उत्पादन घटत असा अनुभव असल्याने ऊस उत्पादकांना चांगले बेणे मिळावे यासाठी कारखान्याने प्रयत्न केले.

कोष्टक २

सुधारित बेणे पुरवठा

| वर्ष | बेणे कांडी | दर रुपये (प्रती हजारास) | सवलतीचा दर (रुपये) (प्रती हजारास) |
|---|---|---|---|
| १९८०-८१ | २,०३,५०० | ७० | ५० |
| १९८१-८२ | ३,२५,००० | ७० | ५० |
| १९८२-८३ | २,१५,००० | ७० | ५० |
| १९८३-८४ | ४,२०,५०० | ७० | ५० |
| १९८४-८५ | १,१२,५०० | ७० | ५० |
| एकूण : | १२,७६,५०० | ७० | ५० |

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

---

२. शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती

कारखान्याने सभासदांना संशोधित नवीन जातीचे सदृढ ऊसाचे बेणे मिळावे याकरिता संशोधन केंद्र पाडेगांव व शिरगांव येथून उच्च प्रतीचे बेणे आणून कारखान्याने स्वत:चा बेणे प्लॉट तयार केला व संशोधन केंद्रातून व कारखाना बेणे प्लॉट मधून १९८०-८१ पासून १९८४-८५ पर्यन्त १२,७६,५०० बेणे कांडी पुरविली. दर एकरी साधारणपणे १० हजार बेणे कांडीची गरज असते. या दृष्टीने विचार करता कारखान्याने पुरविलेली बेणे कांडी साधारणपणे १२८ एकरांना पुरेल इतकी आहे. सुधारित बेणे पुरवठयामुळे ऊसाचे उत्पादन वाढते हे लक्षात घेतल्यास कारखान्याने केलेला बेणे कांडीचा पुरवठा अपुरा आहे. मात्र कारखान्याने ही बेणे कांडी संशोधन केंद्राकडून प्रती हजारी ७० रुपये प्रमाणे घेऊन ५० रुपये या सवलतीच्या दरात पुरविलेली आहे.

क) महाराष्ट्र सरकारच्या अनुदान योजनेचा वापर

महाराष्ट्र सरकारने १९८१-८२ या वर्षापासून २½ एकर बागायत व ५ एकर जिरायत जमीन धारणा असणा-या मागासवर्गीयांना ऊस पिक घेता यावे यासाठी अनुदान योजना जाहीर केली होती. या योजनेचा लाभ घेतलेल्या मागासवर्गीय शेतक-यांचा तपशील खालीलप्रमाणे

कोष्टक ३

अनुदान योजना

| वर्ष | अनुदानपात्र व्यक्ती | अनुदान पात्र व्यक्तींचे एकूण जमीन धारणा क्षेत्र (एकर गुंठे) | अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १९८१-८२ | १२२ | ७९.३२ | १,७९,४२७,५० |
| १९८२-८३ | १८५ | ८०.०९ | १,४८,२२६.२५ |
| १९८३-८४ | १७३ | ७८.३७ | १,२१,७५१.२५ |
| १९८४-८५ | १४७ | ६४.३८ | ७३,६१९.०० |
| एकूण | ६२७ | ३०२.१६ | ५,२३,०२०.०० |

संदर्भ : शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

१९८४-८५ अखेर या अनुदान योजनेतून ६२७ मागासवर्गीयांना ३०२.१६ एकरासाठी रू. ५,२३,०१० मिळालेले आहेत. महाराष्ट्र सरकारची ही योजना ५ वर्षांसाठी होती.

कारखान्यांने या योजनेचा फायदा घेऊन ऊस उत्पादन वाढवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. तसेच या योजनेमुळे समाजातील मागासवर्गीयांना आर्थिक मदत होते आहे हेही लक्षात घेण्याजोगे आहे. सरकारच्या योजना राबविण्यात कारखान्याने घेतलेला पुढाकार म्हणजे कारखान्याने केलेले विकास प्रतिनिधीचे कार्य आहे.

ड) अन्य -
खते, किटकनाशके इत्यादी

१९७७-७८ साली कारखान्यामार्फत ५५८.६०० टन खत, ५३३६ पॅकिटस् अॅझो, ४,००० किलो बी.एच.सी. पावडर व १६६ किलो अॅरेटॉन औषधांचा पुरवठा २५ टक्के सवलतीच्या दरात केला होता.

१९७८-७९ पासून १९८४-८५ अखेर २२३० टन खत १६३६०७ पॅकिटस् अॅझो, १७,००० किलो बी.एच.सी. पावडर व ५१,००० किलो किटकनाशके व इतर औषधांचा पुरवठा करण्यात आला. त्याचबरोबर ऊस उत्पादकांना ऊस पुरवठा केलेल्या प्रमाणात १९८४-८५ पर्यन्त १९,२७,६५६ मे. टन प्रेसमड वाटण्यात आले.[३]

वरील सर्व प्रयत्नांमुळे तसेच साखर कारखाना सुरू झाल्याने परिसरातील ऊस उत्पादकांच्या ऊसाला योग्य किंमती मिळू लागल्याने कारखान्याच्या स्थापनेनंतर चंदगड तालुक्याच्या शेतीव्यवसायात काही बदल होऊ लागले आहेत.

उपलब्ध माहितीनुसार चंदगड तालुक्यातील ऊसाच्या लागवडी खालील क्षेत्र २२९० हेक्टर होते तर १९८३-८४ मध्ये ऊसाच्या लागवडी खालील क्षेत्र ३५०० हेक्टर झाले. अशीच प्रवृत्ती भुईमूगाच्या लागवडीखालील क्षेत्रात आढळते. १९७६-७७

---------

३. शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

मध्ये भुईमूग लागवडी खालील क्षेत्र १०४६ हेक्टर होते. १९८३-८४ मध्ये हे क्षेत्र १३६८ हेक्टर झाले. तसेच हलक्या प्रतीच्या अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र घटत असल्याची प्रवृत्ती दिसून येते, त्याऐवजी तालुक्यातील भाताच्या लागवडीखालील क्षेत्र वाढल्याचे आढळते.[४] नगदी पिके घेण्याची ही प्रवृत्ती म्हणजे सहकारी साखर कारखान्याचा अप्रत्यक्ष परिणाम मानावा लागेल.

इ) शेती संदर्भात अन्य संशोधन

चंदगड तालुक्यातील बागायत उत्पन्नाचे साधन म्हणून काजू बागांचा उल्लेख करावा लागेल. गेल्या पाच वर्षांपासून काजूचा भाव वाढत आहे हे लक्षात घेऊन कार्यक्षेत्रातील खेडयांनी आपल्या गावामधील पड, ओसाड व माळरान जमिनीची निवड करून योजना कारखान्यास सादर केल्यास दर एकरी रु. २०० देण्याचे प्रोत्साहनात्मक धोरण अवलंबले होते. १९८४-८५ अखेर ५२ गावांनी ४०० एकरांसाठी वरील योजना तयार केली व कारखान्यातून ८४००० रुपयांची मदत दिली गेली. तसेच १९८४-८५ या वर्षी वेंगुर्ला नं. १ व वेंगुर्ला नं. २ ही सुधारलेल्या जातींची काजूची रोपे कारखान्याच्या रोपवाटिकेत तयार करून १४,९१५ रोपे मोफत वाटण्यात आली.[५]

तसेच दरवर्षी चंदगड तालुक्यात रताळ्यांचे उत्पादन साधारणपणे १.२५ लाख टन होते. या रताळ्यांपासून स्पिरीट तयार करण्याचा नियोजित कारखाना काढण्यासंबंधीचा पुढाकार कारखान्यांने घेतला आहे.[६]

२) ऊस तारण कर्ज

सभासदांच्या ऊसाच्या तारणावर कर्ज देणे हे कारखान्याने नमूद केलेले एक उद्दिष्ट आहे. भारतीय शेतकऱ्यांची कर्जाची गरज लक्षात घेतल्यास, ऊस तारण कर्जाला विशेष महत्व आहे. परंतु या बाबतीत कारखान्यांने फारशी

---------

४. कोल्हापूर जिल्हा, सामाजिक-आर्थिक समालोचन १९७६-७७ व १९८३-८४.

५. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल १९८४-८५.

६. उपरोक्त.

प्रगती केलेली नाही. कारखान्याने १९८४-८५ या वर्षी केवळ ३२० उत्पादक सभासदांना ७५ लाख रुपयांची ऊस तारण कर्जे दिलेली आहेत.[७] परंतु ज्या ३२० उत्पादक सभासदांना या कर्जाचा लाभ मिळाला ते सर्व सभासद ५ एकरापेक्षा जास्त जमिनीचे धारक आहेत. म्हणजे ही कर्जे मुख्यत: मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांना मिळालेली आहेत. ही घटना कोणत्याही सहकारी संघटनेच्या मूळ तत्वाला बाधा आणणारी आहे. कारण सहकारी संघटनेचा मुख्य हेतू सर्वसामान्यांना लाभ मिळावा हा असतो. महाराष्ट्रातील साखर कारखाने श्रीमंत शेतकऱ्यांना लाभदायक ठरत आहेत अशी टीका केली जाते. या टीकेच्या पार्श्वभूमीवर मुळातच ऊस तारण कर्जाबाबत फारशी प्रगती न करणे या कर्जाचे योग्य वाटप न करणे ही घटना कारखान्याच्या निकोप कामकाजाचे लक्षण मानणे अवघड आहे. आणि ही प्रवृत्ती आर्थिक विषमता वाढविण्यास मदत करू शकते.

३) कामगार कल्याण

कोणत्याही औद्योगिक प्रकल्पात कामगार हा प्रमुख घटक असतो. कामगारांच्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी उपलब्ध करून दिल्यास कामगारांची कार्यक्षमता वाढते. शिवाय औद्योगिक संबंध सुरळीत राहण्याला मदत होते. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यांने कामगारांना पुढील सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

१. कारखान्यांने कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र तसेच केंद्र शासनाने वेळोवेळी जाहीर केलेल्या सवलती त्या त्या वेळेपासून उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

२. केंद्र शासनाच्या बोनस कायद्यातील तरतुदीनुसार कर्मचाऱ्यांना १९७७-७८ पासून १९८४-८५ अखेर अनुक्रमे ८.३३ टक्के, १० टक्के, १४ टक्के, १६ टक्के, १६.६६ टक्के १६.६६ टक्के, १७.२६ टक्के, १८ टक्के बोनस वाटलेला आहे.

----------

७. शेती विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना.

३. कारखान्याच्या परिसरात एक दवाखाना उघडून कामगारांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

४. एकूण ३०७ कामगारांना कारखान्याच्या आवारात घरे बांधून दिली आहेत. आणखी १५० घरांचे बांधकाम चालू आहे.

५. अपघात टाळण्याच्या दृष्टीने सुरक्षिततेसाठी फिरत्या मशीनना गार्डस् बसवण्यात आले आहेत. आवश्यक त्या कर्मचा-यांना सुरक्षित चष्मे (सेफ्टी गॉगल) हातमोजे इत्यादी वस्तू पुरविण्यात आल्या आहेत. तसेच अपघात शिबिरे आयोजित करुन, त्याच बरोबर ` कारखाना निरीक्षक, कोल्हापूर ` यांचे आदेशानुसार सुरक्षा सप्ताह आयोजित करुन त्या संदर्भातली सर्व माहिती कामगारांना पुरविलेली आहे.[८]

४) <u>बायोगॅस योजना</u>

शेतीच्या विकासाप्रमाणेच अन्य महत्वाच्या प्रकल्पाकडे कारखान्याने लक्ष दिले आहे. ऊर्जा समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कारखान्याने बायोगॅस योजना राबवण्याचे प्रयत्न केलेले आहेत.

देशातील वाढत्या लोकसंख्येबरोबर जंगल तोडीचे प्रमाण वाढत आहे. तर दुसरीकडे ऊर्जेच्या प्रश्न अत्यंत उग्र होत आहे. विशेषत: ग्रामीण भारतात इंधनासाठी जळाऊ लाकडाचा वापर जास्त प्रमाणात होत असल्याने जंगल तोडीला मदत होते. जंगल तोड थांबविण्यासाठी पर्यायी इंधन शक्तीपैकी बायोगॅस हे प्रभावी सयंत्र आहे. म्हणून महाराष्ट्र सरकारने आर्थिक सहाय्य देऊन बायोगॅस निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्विकारले आहे.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने ही योजना राबविण्याचे १९८२-८३ पासून ठरविलेले असून ५० बायोगॅस उभारणीसाठी येणा-या खर्चावर २५

-----------

८. कामगार कल्याण कार्यालय, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

टक्के म्हणजे रु. १,००,००० अनुदान देण्याचे धोरण अवलंबण्यात आले आहे. १९८४-८५ अखेर १० बायोगॅसची बांधणी होऊन या योजनेचा लाभ कारखान्याच्या उत्पादक सभासदांना मिळालेला आहे.[९]

५) मद्यार्क शाळा

कोणताही उद्योग उत्पादन क्रियेतून वाया जाणाऱ्या पदार्थापासून पूरक उत्पादन तयार करत असेल तर त्यामुळे वाया जाणाऱ्या साधन सामुग्रीचा वापर होतो. तसेच संलग्न उद्योगापासून वीज, पाणी, इत्यादी उपलब्ध झाल्यास पूरक उद्योग कमी खर्चात उभारता येतो. साखर कारखान्यातून वाया जाणाऱ्या मळीपासून पूरक उत्पादनाची निर्मिती करणे म्हणूनच फायदेशीर ठरू शकते.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यानेही हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून मद्यार्क शाळा बांधलेली आहे. या मद्यार्क शाळेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.[१०]

१. या मद्यार्क शाळेची उत्पादन क्षमता दर दिवशी ४५,००० लिटर्स मद्यार्क इतकी आहे.
२. या मद्यार्क शाळेत भारतात चालू असणाऱ्या मद्यार्क शाळांपेक्षा दर टनामागे ५० लिटर जादा मद्यार्काची निर्मिती होईल.त्यामुळे कारखान्याला दररोज रु. २५,००० वाढीव उत्पन्न मिळू शकेल.
३. या मद्यार्क शाळेत मद्यार्काच्या निर्मितीनंतर वाया जाणाऱ्या पदार्थांचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी असेल.
४. या मद्यार्क शाळेसाठीचा सर्व पैसा कारखान्याने स्वबळावर उभारलेला आहे. कारखान्यांच्या भागांची किंमत रु. १००० वरून रु. २०००

----------

९. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९८२-८३ ते १९८४-८५.

१०. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९८४-८५.

इतकी वाढविण्यात आली. तसेच उत्पादक सभासदांच्या बिनपरतीच्या ठेवींचा व विस्तार निधीचा वापर मद्यार्क शाळेच्या वित्त उभारणीसाठी करण्यात आला. या मद्यार्क शाळेसाठी ४ कोटी रुपयांची गुंतवणूक वरील मार्गांनी करण्यात आली.

५. संपूर्ण आशिया खंडामध्ये अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर या मद्यार्क शाळेत प्रथमच करण्यात आला.

६. या मद्यार्क शाळेमुळे साधारणत: १३० ते १५० कामगारांना रोजगार उपलब्ध होईल.

कारखान्याने स्थापनेच्या वेळी आपल्या उद्दिष्टांत नमूद केल्याप्रमाणे कारखान्याकडे आलेल्या ऊसापासून पूरक उत्पादन तयार करण्यासाठी केलेला हा प्रयत्न निश्चितच चांगला आहे. परंतु या संदर्भात एक गोष्ट खटकते, ती म्हणजे मद्यार्क शाळेच्या वित्त उभारणीसाठी केलेली भागांची किंमतवाढ, भागांच्या किंमत वाढविण्याऐवजी नवीन भाग विक्रीला काढून सभासदांची संख्या वाढविणे जास्त योग्य ठरले असते. ज्यामुळे कारखान्यापासून मिळणाऱ्या आर्थिक व सामाजिक लाभात कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील जास्त व्यक्ती सहभागी होऊ शकल्या असत्या.

तसेच बेलापूर सहकारी साखर कारखान्यांने खुली मद्यार्क शाळा उभारून मद्यार्क शाळेच्या उभारणी खर्चात काटकसर केली आहे अशा प्रकारच्या मद्यार्क शाळेचा कारखान्याने विचार केलेला दिसत नाही.[११]

६) रोजगार निर्मिती

भारतीय अर्थव्यवस्थेत बेकारीची समस्या उत्तरोत्तर अत्यंत उग्र रूप धारण करीत आहे. भारतीय शेतीच्या हंगामी स्वरूपामुळे ग्रामीण भागातील कामगार शहरी

---

११. दैनिक लोकसत्ता, मुंबई, १८-३-१९८७, पृ.४.

भागात रोजगारासाठी जातात व शहरी बेकारी वाढण्याला मदत होते. ग्रामीण भारतातील रोजगारीची समस्या सोडविण्यासाठी साखर कारखाने व साखर कारखान्यामुळे निर्माण झालेले पूरक उद्योग यांच्यातून रोजगाराची संधी उपलब्ध होते.

अ) कारखान्यातून उपलब्ध झालेला रोजगार

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यामुळे रोजगार निर्मितीला कितपत मदत झाली याचा आढावा घेत असताना कोष्टक ४ मध्ये कारखान्यात उपलब्ध झालेला रोजगार दर्शविला आहे.

कोष्टक ४

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यातील रोजगार

| विभाग | कायम | हंगामी कायम | हंगामी | तात्पुरते | अप्रेंटिस | प्रवेशनरी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जनरल ऑफीस | २१ | २ | - | - | - | - | २३ |
| व्हेईकल | ९ | ३ | - | - | - | - | १२ |
| खरेदी ऑफीस | ५ | - | - | - | - | - | ५ |
| कामगार कल्याण | ६ | - | - | - | - | - | ६ |
| दवाखाना | ५ | २ | - | - | - | - | ७ |
| सॅनिटेशन | १० | १ | १ | - | १ | - | १३ |
| गेस्ट हाऊस | ५ | २ | - | - | - | - | ७ |
| सिव्हील | ५ | ३ | - | - | - | १ | ९ |
| एरिगेशन | ३ | - | - | - | - | - | ३ |
| अकौंटंट | २७ | - | - | - | - | - | २७ |
| केन अकौंटंट | २९ | १ | - | - | - | - | ३० |
| सुरक्षा | ४० | १३ | - | - | - | - | ५३ |

<u>कोष्टक ४ (पुढे चालू...)</u>

| विभाग | कायम | हंगामी-कायम | हंगामी | तात्पुरते | अॅप्रेंटिस | प्रोबेशनरी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शेती | ६३ | ७५ | - | १ | - | - | १३९ |
| टाईम ऑफिस | ९ | १ | - | - | - | - | १० |
| शुगर गोडावून | ५ | - | - | - | - | - | ५ |
| केन यार्ड | २ | ३७ | - | - | - | - | ३९ |
| स्टोअर | १४ | ४ | - | - | - | - | १८ |
| इंजिनिअरिंग | १८ | ९२ | - | २ | २ | - | २१४ |
| रसायन | ३८ | ११३ | - | - | - | १ | १५२ |
| मद्यार्क शाळा | १ | - | - | - | - | - | १ |
| एकूण : | ४१५ | ३४९ | १ | ३ | ३ | २ | ७७३ |

संदर्भ : कामगार कल्याण कार्यालय : दौंड शेतकरी सहकारी साखर कारखाना १९७७-७८ ते १९८४-८५ प्रत्यक्ष मिळवलेली माहिती.

कोष्टक ५ प्रमाणे दौंड सहकारी साखर कारखान्यामुळे ४१५ लोकांना कायम स्वरूपाचा रोजगार उपलब्ध झाला आहे. त्याचबरोबर प्रत्येक गळित हंगाम काळात ३४९ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झालेला आहे. नमूद करण्याजोगी गोष्ट म्हणजे कारखान्याच्या कार्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार कारखान्यात रोजगार मिळालेले कामगार कारखान्याच्या कार्यक्षेत्रातीलच आहेत.

ब) <u>ऊस तोडणी व वाहतूक इत्यादीमुळे मिळणारा रोजगार</u>

कारखान्यात कामाची संधी उपलब्ध होण्याबरोबरच अनेकांना ऊस मळ्यात रोजगार उपलब्ध होतो आहे. ऊसाची लागवड, तोडणी व वाहतूक इत्यादीसाठी

मजूर लागतात व त्यांच्यातून भूमिहीन शेतमजूरांना जास्त दिवस काम मिळू शकते. या बाबतचा तपशील कोष्टक ५ मध्ये दिलेला आहे.

कोष्टक ५

ऊस तोडणी, वाहतूक इत्यादीमुळे झालेली रोजगार निर्मिती

| वर्ष | ट्रक | ट्रॅक्टर | बैलगाडी | ऊस तोडणी मजूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १९७७-७८ | ८५ | २२ | २०० | २,२८१ | २,८९५ |
| १९७८-७९ | ६५ | २० | २७६ | २,७१० | २,४३२ |
| १९७९-८० | ६३ | २५ | ४२५ | १,५७८ | २,६०४ |
| १९८०-८१ | ६९ | २४ | ४५० | १,८०९ | २,८९५ |
| १९८१-८२ | ८९ | २९ | ४९१ | १,७६० | २,५७८ |
| १९८२-८३ | ७९ | ३१ | ४४७ | १,९२५ | ३,०३९ |
| १९८३-८४ | ७५ | २१ | ३९५ | १,८२० | २,८०२ |
| १९८४-८५ | ७९ | १९ | ३९२ | २,३३७ | ३,३१७ |

संदर्भ : जनरल ऑफिस, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना १९७७-७८ ते १९८४-८५ प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

कारखान्याच्या गळित हंगाम काळात केवळ ऊस तोडणीसाठी साधारणपणे १५०० ते २००० मजूरांना रोजगार उपलब्ध होतो. ग्रामीण भारतातील बिगर कामाचे दिवस लक्षात घेतल्यास या रोजगाराचे महत्व स्पष्ट होईल. चंदगड तालुक्यातील शेतमजूरांना जून ते नोव्हेंबर या हंगाम काळात शेती व्यवसायात रोजगार उपलब्ध होतो. डिसेंबर ते जून या महिन्यात शेतीत रोजगार नसतो ते बेकार असतात. तर साखर कारखान्यात साधारणपणे जानेवारी ते एप्रिल या महिन्यात रोजगार मिळतो व बेकार व्यक्तींना रोजगार संधी उपलब्ध होते.

कारखान्याच्या परिसरात ऊस वाहतूकीसाठी ट्रक, ट्रॅक्टर आणि बैलगाडींचाही वापर होतो. या ऊस वाहतूकीसाठी जनावरे व कामगार गुंतलेले असतात. एका ट्रक मागे व ट्रॅक्टर मागे एका माणसाला रोजगार मिळतो असे मानले तरी ट्रक व ट्रॅक्टर वाहतूकीतून प्रत्येक गळित हंगामात साधारणपणे २०० ते ३०० लोकांना रोजगार उपलब्ध होतो व साधारणपणे ४०० ते १००० जनावरे गुंतलेली असतात.

मात्र रोजगाराची अशी निर्मिती होत असूनही या रोजगारात कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील कामगारांचे प्रमाण केवळ २० टक्के आहे. राहिलेला रोजगार बीड, उस्मानाबाद व कोल्हापूर जिल्ह्यातील कामगारांना उपलब्ध होत असल्याचे आढळले.

क) अन्य रोजगार निर्मिती

तंत्रनिकेतन महाविद्यालयातील रोजगार

कारखान्याने कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी तंत्रनिकेतन विद्यालय सुरू केलेले आहे. तंत्रनिकेतन महाविद्यालयामुळे २२ उच्च पदवी धारकांना, ११ पदवी धारक व ३ शिपाई असा एकूण ३६ तरूणांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी भोजनगृह सुरू झाल्यामुळे १२ इतर व्यक्तींना रोजगार मिळालेला आहे.

कारखान्याच्या स्थापनेमुळे कार्यक्षेत्रात प्रामुख्याने कारखान्याच्या ठिकाणी चार उपहार गृहे, दोन भोजनालये, चार पानपट्टी गाडया, दोन केस कर्तनालय दुकाने, दोन धोब्याची दुकाने, दोन किराणा मालाची दुकाने निघाल्यामुळे रोजगार उपलब्ध झालेला आहे त्याचबरोबर दौलत कामगार सोसायटीचे ` दौलत विविध वस्तू भांडार ` शेतकरी खरेदी विक्री संघाचे ` धान्य दुकान व कापड दुकान ` अशा धंद्यातून रोजगार निर्मितीला मदत झाली.

तसेच ट्रॅक्टर पंक्चर व वेल्डींग सोयीसाठी चार गॅरेज व दोन पेट्रोल पंप उभारलेले आहेत. त्याचप्रमाणे इंजिन स्पेअर पार्टस्, सिमेंट पाईप, कागद निर्मिती, हार्डवेअर इत्यादी छोटे उद्योग सुरू झाले असून या उद्योगामुळे साधारणपणे २२० कामगारांना काम उपलब्ध झाले आहे. तसेच मद्यार्क शाळेमुळे १३० ते १५० कामगारांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल.[१२]

शेतीवर आधारित उद्योगामुळे ग्रामीण भागात नवीन सुविधा कशा निर्माण होतात व अशा उद्योगामुळे भोवतालच्या परिसरात हळूहळू बदल होऊ लागतात हे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. ज्या चंदगड तालुक्यात १९७१ मध्ये नाव घेण्याजोगा एकही उद्योग अस्तित्वात नव्हता त्याच तालुक्यात लहान मोठया उद्योग संस्था सुरू होण्याचे श्रेय दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याला द्यावे लागेल.

७) <u>वाहतूक सेवा</u>

(अ) <u>रस्ते</u>

रस्ते वाहतूकीला अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या असे म्हणतात. विशेषात: ग्रामीण भारतात रस्ते वाहतुकीमुळे खेडयांचा निकटच्या बाजारपेठेशी संबंध येतो. बाजारपेठेच्या विस्तारामुळे शेतमालाला चांगली किंमतही मिळू शकते. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात रस्ते वाहतूकीला आणखीन एक महत्व असते. वाहतूक सोयींचा विस्तार झाल्यास कारखान्याला जलद व नियमितपणे ऊसाचा पुरवठा होऊ शकतो वाहतूक खर्च कमी होतो. हे लक्षात घेऊनच कारखान्याने स्थापनेच्या वेळीच नवीन रस्ते बांधणी करणे व अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची निगा राखणे हे एक उद्दिष्ट ठरविलेले होते. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी कारखान्याने पुढील प्रयत्न केले.

-----------

१२) दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९८४-८५.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रात बेळगाव-वेंगुर्ला हा राज्य महामार्ग आहे. या राज्य महामार्गाला जोडणारे अन्य अंतर्गत खडीचे जिल्हा मार्ग आहेत. रस्त्यांची बांधकामे जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडून केलेली आहेत. चंदगड तालुका हा अतिपावसाळी प्रदेशात येत असल्याने पावसाळ्यात या रस्त्यांची दुर्दशा होते. अशा रस्त्यांची दुरुस्ती, तसेच गावातील रस्त्यांची पुनर्रचना करण्यासाठी ग्रामपंचायतीना अनुदान देऊन वाहतूक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न कारखान्याने केलेला आहे.

कोष्टक ६

कारखान्याने केलेली रस्ते दुरुस्ती

| | रस्त्याची दुरुस्ती | लांबी | खर्च (रुपये) |
|---|---|---|---|
| १) | किटवाड ते कुदनूर | ४ कि.मी. | १०,००० |
| २) | कुदनूर ते राजगोळी | ३ कि.मी. | ७,००० |
| ३) | ढोलगरवाडी ते अंजनओहळ | १½ कि.मी. | ३,००० |
| ४) | राज्यमार्ग ते गुडेवाडी | ३ कि.मी. | १२,००० |
| ५) | माणगांव ते मलतवाडी | २ कि.मी. | ७,००० |
| ६) | वैद्यनाथ डोंगर ते मांडेदुर्ग | २ कि.मी. | ७,००० |
| ७) | कारखाना ते आंबेवाडी | २ कि.मी. | ६,००० |
| ८) | माणगांव ते मलगड | २ कि.मी. | २,००० |
| ९) | आसगांव ते आसगांव फाटा | २ कि.मी. | ४,००० |
| १०) | भोगोली ते भोगोली फाटा | ३½ कि.मी. | ५,००० |
| ११) | इब्राहिमपूर ते इब्राहिमपूर फाटा | २ कि.मी. | ६,००० |
| १२) | शिरगांव ते शिरगांव फाटा | ½ कि.मी. | २,००० |
| १३) | कारखाना ते हलकर्णी | १½ कि.मी. | ६,००० |
| १४) | वाळकोळी ते वाळकोळी फाटा | २ कि.मी. | ७,००० |
| १५) | कानडेवाडी ते राज्यमार्ग | १½ कि.मी. | ५,००० |
| १६) | इतर रस्ते दुरुस्ती | - | २४,००० |
| | एकूण : | | १,२३,००० |

संदर्भ : बांधकाम विभाग, दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष मिळविलेली माहिती.

वरील रस्त्यांची हंगाम काळात खाच-खळगे भरणीसाठी तसेच ट्रक ऊस वाहतूकीस अडथळा येणाऱ्या जागेत रस्ता दुरुस्त करणेसाठी वरील खर्च करण्यात आला.

तसेच चंदगड तालुका समितीच्या शिफारशीनुसार शिनोळी-तुडये रस्त्यावर रु. ८२,००० खर्च व कारंजगाव हाल्लारवाडी रस्त्यावर रु. ७३,००० खर्च करून पक्क्या स्वरूपाची मोरी बांधकामाची कामे केली गेली.[१३] ही गावे ऊसाच्या पुरवठयाच्या दृष्टीने महत्वाची असल्याने त्यामुळे वरील बांधकामापासून त्या क्षेत्रातील ऊसाच्या पुरवठयातील अडथळे कमी होण्यास मदत झाली.

ब) ट्रक व ट्रॅक्टर योजना

ट्रक-ट्रॅक्टर हे वाहतूकीचे आधुनिक साधन आहे. ट्रक-ट्रॅक्टर मुळे वाहतूकीच्या परंपरागत साधनापेक्षा लवकर वाहतूक होऊ शकते. शिवाय ट्रॅक्टर मुळे शेतीच्या मशागतीला मदत होते हा दुहेरी फायदा लक्षात घेऊन कारखान्याने ट्रक-ट्रॅक्टर योजना राबविली. कारखान्याच्या शिफारशीवर राष्ट्रियकृत बँकानी ट्रक ट्रॅक्टरच्या खरेदीसाठी कर्ज पुरवठा करायचा होता. या योजनेचा लाभ १०० सुशिक्षित बेकारांना देण्याचे ठरविण्यात आले. १९७८-७९ मध्ये सुरु झालेल्या या योजनेसाठी १९८४-८५ अखेर ४० ट्रक्स व १२ ट्रॅक्टर्स उपलब्ध झाले.[१४] या साधनांचा ऊस वाहतूकीसाठी वापर करून मिळालेल्या उत्पन्नातून बँकेच्या कर्जाची परतफेड केली जाते. ट्रक-ट्रॅक्टर योजनेमुळे वाहतुकीच्या आधुनिक साधनांचा विस्तार होण्याला मदत झाली. शिवाय त्याच्यातून सुशिक्षित बेकारांच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्याला मदत झाली.

८. भांडवल संचय

आतापर्यंन्त दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने हाती घेतलेल्या विविध कार्यातून कारखान्याच्या कार्यक्षेत्रात झालेल्या बदलांचा आढावा घेतलेला आहे. या आर्थिक बदलांच्या प्रमाणेच दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीपुढे भांडवल संचयलाही मदत झाली असणार. सहकारी साखर कारखान्यामुळे ग्रामीण

भागातील अल्पबचती, भाग भांडवल उभारणीमुळे एकत्र होतात व या बचती उत्पादक कार्यासाठी वापरल्या जातात. कारखान्याने भाग भांडवलाच्या रूपाने किती पैसा उभारला याचा प्रथम विचार केला आहे.

<u>कोष्टक ७</u>

भाग भांडवलामुळे झालेला भांडवल संचय

(रुपये)

| वर्ष | सभासद वसूल भाग भांडवल | महाराष्ट्र सरकार | एकूण |
|---|---|---|---|
| १९७६-७७ | ४९,४९,७३५ | १५,५०,००० | १,३६,९९,७३५ |
| १९८४-८५ | १,३५,४२,४७४ | ९०,००,००० | २,२५,४२,४७४ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना,
वार्षिक अहवाल, १९७६-७७ व १९८४-८५.

हे कोष्टक असे दर्शविते की, कारखान्याच्या पहिल्या गळित हंगामकाळात एकूण भाग भांडवल उभारणीपैकी २४,१४ टक्के वाटा सभासदांच्या (व्यक्ती व संस्था) भाग भांडवलाचा होता. कारखान्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीनंतर ८ वर्षात कारखान्याच्या भाग भांडवलात साधारणपणे ८८ लाख रुपयांची वाढ झाली. ही वाढ प्रामुख्याने सभासदांच्या भाग भांडवलातून झाली. १९८४-८५[१] मध्ये कारखान्याच्या अधिकृत भाग भांडवलापैकी ५३.९८ टक्के भाग भांडवल वसूल झालेले होते. यावरून कारखान्यामुळे भांडवल संचयाला कशी मदत झाली हे स्पष्ट होईल.

१ कारखान्याच्या मूळच्या अधिकृत भाग भांडवल २०५ लाख रुपये होते. ते ४१० लाख रुपये केले आहे. या संबंधीचा उल्लेख प्रकरण तीनमध्ये केलेला आहे.

ऊस उत्पादकांना दिल्या जाणाऱ्या ऊसाच्या दरातून काही पैसा कापून घेऊन त्यातून विविध प्रकारचे निधी उभारण्याची पध्दत महाराष्ट्रातील अनेक साखर कारखान्यांनी स्विकारली आहे. अशा निधीमुळे उत्पन्नातून काही भाग आपोआप बचतीच्या स्वरूपात जमा होतो व अशा बचतींचा वापर त्याच भागाच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी करता येते. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या या निधीबाबतचा तपशील पुढे दिला आहे. तसेच कोष्टक ८ मध्ये कारखान्याकडे जमा झालेला निधी दर्शविला आहे.

१. उत्पादक सभासदांची बिनपरतीची ठेव

कार्यक्षेत्रातील उत्पादक सभासदांनी पुरविलेल्या ऊस टनातून, दर टनी १० रुपये कपात करून, अशा स्वरूपाची ठेव जमा केली जाते. अशात-हेने जमा केलेली ठेव परत केली जात नाही. राज्य सरकारने भाग भांडवल रूपाने गुंतविलेल्या भांडवलाची व दीर्घकालीन कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थाची कर्जफेड झालेली असेल तर ठेवीच्या रकमेचे रूपांतर भागामध्ये केले जाते. ठेवीवर ९ टक्के व्याज दिले जाते.

२. बिगर सभासदांची परतीची ठेव

कार्यक्षेत्रातील जे ऊस उत्पादक कारखान्याचे भागधारक नाहीत परंतु कारखान्याला ऊस पुरवठा करतात. त्यांच्याकडून दर टनाला १० रुपये कपात करून अशाप्रकारची ठेव जमा केली जाते. ही ठेव खातेदाराला परत दिली जाते. ठेवीवर ९ टक्के व्याज दिले जाते.

३. मुदत ठेवी

५ वर्षे व १० वर्षे मुदतीच्या ठेवी संस्थेच्या भांडवली खर्चासाठी जमा केल्या जातात. दिलेल्या मुदतीनंतर त्या सभासदांना परत दिल्या जातात. ऊस पुरविणाऱ्या कोणत्याही शेतकऱ्याकडून, किती मुदतीच्या ठेवी घ्याव्यात हे संबंधित संचालक मंडळ ठरविते. दोन्ही प्रकारच्या ठेवीवर ९ टक्के व्याज दर दिला जातो.

४. विस्तार ठेव :

संस्थेच्या विस्तारासाठी उदा. वाढीव गाळप क्षमता, पूरक उत्पादन व यंत्रसामुग्री बांधणीसाठी, विस्तार ठेव घेतली जाते.

५. भाग विकास निधी

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील रस्ते, दुरुस्ती, पाणीपुरवठा योजना, शाळा कॉलेज बांधणी, इत्यादी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी भाग विकास निधी या स्वरुपाचा निधी कार्यक्षेत्रातून ऊस ठरविणाऱ्या शेतकऱ्याकडून दर टनी कपात केला जातो.

६. अन्य विकास निधी

या निधीमध्ये सर्वसाधारणपणे दुर्बल घटकांना घरबांधणी व अल्पबचत गुंतवणूक या घटकांचा समावेश असतो.

**कोष्टक ८**

**कारखान्याकडे जमा झालेला निधी**

| तपशील | १९७७-७८ | १९७८-७९ | १९७९-८० | १९८०-८१ | १९८१-८२ | १९८२-८३ | १९८३-८४ | १९८४-८५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पादन सभासदांची बिनपरतीची ठेव | १६२४७९ | २६२६३९२ | ३७३६३६३ | ४१९६१६८ | ६९९६९६८ | ८४८३८४७ | ९७२३७७ | ७७४७७ | ४३३३०९३२ |
| बिगर सभासदांची परतीची ठेव | ४१५३६५ | ८८३३१५ | ११२७५९२ | १४३७५४० | २४६००४० | ३३१७६९१ | ३६१६५६१ | ३७२९८८६ | १६९९११९० |
| वैयक्तिक ठेवी | २३८० | २३८० | २०२५ | ६४४ | - | - | - | - | ७४२९ |
| डिपॉझिटस् | १६१२२२ | २१६२३६ | १९४८३० | ३२२७७४ | २१४२८५ | ४४९७०१ | १११९३६ | १९६७३६ | १८६५२९० |
| १० वर्षे मुदतीची ठेव | - | | १३७६९७९ | १३७६९७९ | १३७६९७९ | १३७६९७९ | २१४६३४४ | १५०७३९ | १३१६२९८९ |
| ५ वर्षे मुदतीची ठेव | - | | - | | - | १३७२४६५ | १३७२४६५ | ८५११६८४ | ११२५६६१४ |
| विस्तार ठेव | - | | - | | १३५२९७२ | १३५२९७२ | १३५२९७२ | १३५२९७२ | ५४११८८८ |
| भाग विकास निधी | - | १९४७८२ | ३२७१५० | - | ४५६८४२ | १०८२९४४ | ६१७६५६ | १०५९१०० | ३७३८४७४ |
| मुख्यमंत्री निधी | - | | ६८८८३ | ७५७०४ | १३५६८ | ७७२१९ | १३५३६० | १०७७३७ | ४७८४७१ |
| अन्य विकास निधी | | | २७५५३४ | ६०५६३९ | ९४७५२३ | १८११७०६ | ८६३१३७ | १०३२३०८ | ५५३५८४९ |
| एकूण : | ७४१४४७ | ३९२२१०६ | ३७५७८५६ | ७७४५५४१ | १३४१२७३७ | १९३२४७९४ | १९९३९४३८ | २८५७३१३ | १०१७८६४२६ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना,
वार्षिक अहवाल १९७७-७८ ते १९८४-८५.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY * KOLHAPUR

कारखान्याच्या पहिल्या गळित हंगाम काळात वरील मार्गांनी रु.७,४१,४४७ कारखान्याकडे जमा झालेले होते. तर आठव्या गळित हंगामात रु. २,८५,७३,६१३ जमा झाले. केवळ उत्पादक व बिगर उत्पादक सभासदांच्या ठेवींच्या रुपाने १९८४-८५ मध्ये कारखान्याकडे रु. १,०८,०४,५९२ जमा झालेले होते. यामध्ये उत्पादक सभासदांच्या ठेवी रु. ७०,७४,७०७ होत्या. या ठेवींचे कालांतराने भाग भांडवलात रुपांतर होईल ज्यामुळे कारखान्यास जास्त आर्थिक बळकटी येईल. बिगर सभासदांच्या वाढत्या ठेवी लक्षात घेतल्यास त्यांना कारखान्याचे सभासद करुन घेणे जास्त फायदेशीर ठरले असते. एका उत्पादक सभासदाला एकापेक्षा जादा भाग देण्याऐवजी बिगर सभासदांना सभासद करुन घेण्याचे प्रयत्न जास्त उपयुक्त ठरतील. परंतु असे प्रयत्न कारखान्याने केलेले दिसत नाहीत.

याशिवाय भाग विकास निधी व अन्य विकास निधी इत्यादीमुळे जमा झालेली रक्कम कारखान्याच्या परिसराचा कायापालट घडवून आणण्यास उपयोगी पडते आहे. दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या अभावी अशाप्रकारचा भांडवल संचय होऊ शकला असता काय हा प्रश्न महत्वाचा आहे.

ऊस लागवडीसाठी जास्त भांडवल गुंतवणूक आवश्यक असते हे लक्षात घेतल्यास भांडवल संचयातील कारखान्याचे महत्व लक्षात येईल. याशिवाय पाणी पुरवठा ऑईल इंजिने, वीजेच्या मोटारी व पंप, इ. साधनांमुळे भांडवल गुंतवणूकीला ही मदत झाली असणार हे उघड आहे. कारण कारखान्यामुळे ऊसाच्या लागवडी खालील वाढ झाली आहे. साहजिकच वरील साधनांचा वापरही वाढला आहे.

या कारखान्याच्या स्थापनेनंतर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक शेती पतपुरवठा संस्थांच्या आर्थिक उलाढालीत उल्लेखनीय वाढ झाल्याचे आढळते. याबाबतची माहिती कोष्टक क्र. ९ मध्ये दिली आहे.

काष्टक - ५

प्राथमिक शेती पतसंस्थांनी दिलेल्या अल्पमुदत , मध्यम मुदत कर्जे - १९७८-७९ - १९८४-८५ वर्षाकरिता

| अनु. | चंदगड तालुक्यातील प्राथमिक शेती पतसंस्थेचे नाव | अल्प मुदत कर्ज - १९७८-७९ |  |  | अल्प मुदत कर्ज - १९८४-८५ |  |  | मध्यम मुदत कर्ज १९७८-७९ | मध्यम मुदत कर्ज १९८४-८५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  |  | एकूण | भात व इतर | ऊस | एकूण | भात व इतर | ऊस |  |  |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १० |
| १. | तुर्केवाडी | ६,०८,६४५ | ८९,०१७ | ५,११,५४८ | १७,५५,७६३ | ५,८१,२१६ | ११,७४,५४७ | ८,२४० | २,३८,००० |
| २. | निट्टूर | १,७९,११० | ७,१४३ | १,७७,८६६ | ४,३४,३०७ | २,८०,२६१ | १,५४,०४६ | ५५६ | ६५,१०० |
| ३. | कोवाड | २,१५,२७५ | ४२,८२० | १,०३,१५५ | ४,५४,९१६ | ८६,१२७ | ३,७१,७८९ | - | ४,७५१ |
| ४. | तुडये | १,१८,००७ | ४५६ | १,७२,५५१ | २,९४,७१३ | ३४,९८१ | २,५५,७३२ | - | १,४५,७५० |
| ५. | हाजगोळी | १४,८९७ | ८,७४५ | ६,११८ | २,३७,२७८ | २,१८,४७० | १८,८०८ | - | ५५,३३५ |
| ६. | मलतवाडी | ७७,०४१ | ६४,७९० | १२,३५१ | १,१६,११४ | १,१६,११४ | - | - | १७,०१० |
| ७. | हिंडगाव | ४४,६४५ | १३,२२० | ३१,४२५ | ४,५५,०५८ | ८८,७५८ | ३,६६,३०० | - | ४५,२०० |
| ८. | हेरे | ८२,६१० | ६०,३०५ | २,२०,३०५ | १०,५४,७९९ | ३,४२,८९४ | ६,७१,६०५ | - | - |
| ९. | तांबुळवाडी | २,६०,११५ | ४०,००० | २,२०,११५ | ५,९६,५३३ | १,१२,९८९ | ४,८३,५४४ | - | २,२५,४६२ |
| १०. | नागनवाडी | ३,२९,१७२ | ६०,१०२ | २,६९,०७० | - | - | - | ५०० | ५,७१२ |
| ११. | उत्साळी | १,४४,५८३ | ४०,२९० | १,०४,२८३ | ४,७८,७६५ | २,१३,६०७ | २,६५,२५८ | - | - |
| १२. | अडकूर | २,७२,८२९ | ८३,१०९ | १,८९,७२० | ६,८४,४८२ | ३,५७,३२७ | ३,२७,१५५ | - | २२,६०० |
| १३. | बसों | ६१,१६३ | ११,०१३ | ५०,१५० | ८,७८,४१४ | १,७४,२०० | ७,०४,२१४ | - | ९९१ |
| १४. | कूदनूर | १,९५,०४७ | १,४३,६५८ | ५१,३८९ | ५,६९,५०४ | ३,८९,७६९ | १,७१,२३५ | - | - |
| १५. | कानूर | ६,००,२३८ | २१,५१९ | ५,७८,७१९ | ११,३९,८१५ | ७२,५४० | १०,६३,०५० | - | ७१,३३६ |
| १६. | आमरोळी | १,९५,३३५ | ९०,६३५ | १,०४,७०० | १०,१९,६२० | १०,१६,४२० | ५,४०,१०० | - | १७,४५५ |
| १७. | किटवाड | ५५,२३८ | ३७,६५५ | १७,६३३ | १,०२,४३३ | ९४,६२७ | ७,८०६ | १,६६० | - |
| १८. | ढोलगरवाडी | ६७.२९६ | ३९ ५९८ | २९ ६९८ | १ ६३ ३१३ | ७१ २४४ | ९१ ०२५ | ■ | ■ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९. | गुड्डेवाडी | ४७,१०० | २०,५०० | ४६,६०० | २,६३,६५९ | १,३६,८८२ | १,२६,७७७ | - | - |
| २०. | होसूर | १,५२,६६८ | १,१०,७८१ | ४१,८८७ | ४,३०,२१७ | ३,२४,५७५ | १,०५,६४२ | - | ५५,७६० |
| २१. | राजगोळी खुर्द | ४५,९०० | ३०,९०० | १५,००० | ४,९७,४१४ | २,५२,००७ | २,४५,४०७ | १,०२४ | ४३,८९० |
| २२. | सुरूते | १,२३,२१५ | ३३,१०० | १,००,११५ | ७,१७,०६९ | ३,०५,०३४ | ४,१२,०३५ | - | १,१३,२२० |

कोष्टक - ९ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३. | विंझणे | ४५,१४२ | ३९,०४२ | ६,१०० | १,०१,९३८ | ९१,९३५ | १०,००२ | - | - |
| २४. | आसगोळी | २९,१०० | १२,९५० | १६,१३० | २,७३,३५८ | १,००,४२३ | १,७२,९३५ | - | - |
| २५. | चंदगड | ३,८१,६६३ | ८२,८५६ | २,५८,८०७ | १४,१७,३४० | २,७६,७५५ | ११,४०,५८५ | - | - |
| २६. | म्हाळेवाडी | १,१२,५७१ | ३७,६९८ | ७४,८०३ | १,३९,०८५ | ५३,७७० | ८५,३१५ | - | - |
| २७. | कार्वे | २,०९,७६४ | ४७,१०९ | १,६२,६५५ | ३,४६,४२५ | १,३४,९६४ | २,११,४६१ | - | - |
| २८. | उमगांव | ६,१९४ | ६,१९४ | - | - | - | - | - | - |
| २९. | हलकर्णी | १,५३,९११ | १९,०२६ | १,३४,८५५ | ५,०९,७८७ | १,५२,९७२ | ३,५६,८१५ | - | ८०० |
| ३०. | जंगमहट्टी | ९८,२४६ | ३४,२५९ | ६३,९८७ | ४,१५,५२० | १,५८,७७० | २,५६,७५० | - | - |
| ३१. | किणी | २,८८,६८५ | ६४,५९० | १,२४,०५५ | ४,१५,८६४ | १,६४,१३४ | २,५१,७३० | - | ९०,७८५ |
| ३२. | माडवळे | १,०३,२३४ | ५१,७८० | ५१,४५४ | २,३७,१५८ | १,२७,६९४ | १,०९,४६४ | - | ८०,३६८ |
| ३३. | आंबेवाडी | ३०,७९४ | २२,४६३ | ८,२७१ | ९,१८,७१८ | १,२७,१३६ | ९१,५८२ | - | - |
| ३४. | कालकुंद्री | २,३०,३१६ | १,६०,०४० | ७०,२७६ | ५,४७,०३० | ३,१६,३७० | २,२६,६६६० | - | ७९,९९९ |
| ३५. | दुंडगे | २,०५,५८४ | ४९,५३४ | १,५६,०४९ | ३३,१५,१५६ | ५४,५०० | २,८०,६५६ | - | - |
| ३६. | कागणी | १,१४,७५५ | ५८,०३४ | ५६,७२१ | २,४३,२२५ | ९८,००३ | १,४५,२२२ | - | ४३,८९० |
| ३७. | ढकोकटे | २९,६६५ | २३,२७७ | ६,३८८ | २५,३२७ | २५,३२७ | - | - | - |
| ३८. | चिंचणे | ५१,१५८ | २८,५३१ | २२,५२७ | १,८३,९२९ | ४६,३९० | १,३७,५३९ | - | - |
| ३९. | माणगांव | ४,४८,४९० | ४२,६९० | ४.०५,८०० | २,६९,९९८ | ५०,५३२ | २,१९,४६६ | ४,५०० | - |
| ४०. | इब्राहिमपूर | ४८,००२ | ९,८३३ | ३८,१६९ | ३,३५,०५७ | ५४,[illegible] | [illegible] | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४१. | मांडेदुर्ग | ८४,५६५ | २२,५०९ | ६२,०५६ | ३,४१,१९८ | १,१७,२६४ | २,३१,९१४ | - | १,५९४ |
| ४२. | नांदवडे | ७३,१३० | १८,९४० | ५४,१९० | १,७२,१८३ | ३६,९२३ | १,३५,२५० | - | - |
| ४३. | नागरदळे | १,३३,७६१ | १,०५,०९३ | २,२८,७४६ | २,४८,३१६ | १,५०,४०० | ९७,९१६ | - | - |
| ४४. | कडलगे | १,०३,०८९ | ५,३२५ | ९७,७५७ | ३,९२,५६४ | १,५८,१५६ | १,९४,४०८ | - | - |
| ४५. | कानडी | ४,८४६ | २,५१४ | २,३३१ | ३,६५,७४४ | १,१३,९२० | २,५१,८२४ | - | १,९५,६५० |

कोष्टक - १ (पुढे चालू...)

| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४६. | नागवे | ३०,२६३ | १,३९७ | २८,८६६ | ७९,७१८ | ३१,६४८ | ४७,०७० | - | - |
| ४७. | बागीलगे | ३,२८,११५ | १६,३७२ | २,३२,५४३ | ४,५८,०४१ | १,७४,०१२ | २,८४,०६९ | - | २९,८१० |
| ४८. | पाटणे | ९७,१६९ | ७,९६९ | ९०,००० | २,०३,७०१ | ६९,४७४ | १,४०,३९७ | - | - |
| ४९. | राजगोळी बु. | ३१,००० | १८,५०० | २,५०० | २,७७,५११ | ७०,५६८ | १,९६,९४३ | - | २७,१९५ |
| ५०. | तेवूरवाडी | १,०२,३६९ | ७१,२६३ | ३१,१०७ | २,३४,७८७ | २,०३,८२० | ३१,९६४ | - | १५,७५० |
| ५१. | तडशिनहाळ | ७४,३८१ | १०,२०० | ६४,१८१ | १९,३३,४६८ | १८,५४,९६४ | ७८,५०४ | - | २,०१,९७२ |
| ५२. | कुरणी-बुझावडे | ९०,६५० | ३८,०६० | ५२,५९० | ५,१३,४८२ | १,०३,१९७ | ४,१०,३२५ | - | ७०,८१० |
| ५३. | ढोलगरवाडी | १,६४,११८ | ४७,६२० | १,१७,२९८ | २,१९,०१३ | ४९,६९४ | १,६९,३१९ | - | ८,८०८ |
| ५४. | शिवनगे | २,३३,५०० | ६८,५८५ | २,५४,९५५ | ६,५८,७१५ | १,३४,६८९ | ५,२४,०२६ | - | ९४,१८० |
| ५५. | शिनोली बु. | १७,२७९ | २,११० | १५,१५९ | २,०२,५९६ | ८१,९०० | १,२०,६९६ | - | ७२,४१० |
| ५६. | तळगुळी | ५२,६५६ | ४०,००० | १२,६५६ | १,२९,३४७ | १,०७,७५० | २१,६३७ | - | ४,२४० |
| ५७. | देवूरवाडी | - | - | - | १,२३,८६३ | ८०,६६३ | ४३,२०० | - | ७,१७२ |
| ५८. | सुंडी | १,३०,०८७ | ७३,९०३ | ५६,१८४ | २?२६,६५३ | १,७१,६३३ | ५५,०२० | - | - |
| ५९. | न्हावेली | ६२,२६२ | ५,२६८ | ५६,९९४ | १,९९,८५१ | ५७,७८६ | १,४१,३६५ | - | - |
| ६०. | शिनोळी खुर्द | ८५,३६४ | ९,२३४ | ५६,१३० | २,३३,५१२ | ५८,५७० | १,७०,२४२ | - | - |
| ६१. | दाटे | ७४,३०० | २८,७७६ | ४५,८२४ | ३,७६,६८७ | २,०८,४४७ | १,६८,३०० | - | १,०२,२४७ |
| ६२. | सातवणे | १,०३,२८७ | १५,७१५ | ८७,५०० | ३,५५,२८४ | ४६,८३४ | ३,०८,४५० | - | - |
| | एकूण : | ८६,१५,५१३ | २६,२१,५७७ | ५९,९३,९३६ | २,५४,५२,३५० (१९५ टक्के वाढ) | ९७,१७,८२१ (२७० टक्के वाढ) | १,५७,३४,५२९ (१६३ टक्के वाढ) | १६,४८० | २२,४४,१९७ (१३५१७ टक्के |

संदर्भ : सहाय्यक निबंधक कार्यालय, चंदगड.

कोष्टक ९ च्या साहाय्याने प्राथमिक शेती पतसंस्थांनी १९७८-७९ ते १९८४-८५ या वर्षांकरिता पुरविलेल्या अल्पमुदत व दिर्घमुदत कर्जातील फरक अभ्यासला आहे.

१) जरी १९७८-७९ ते १९८४-८५ या कालावधीत पतसंस्थाची संख्या बदललेली नसली तरी महत्वाचे बदल झालेले आहेत. १९७८-७९ ते १९८४-८५ या कालावधीत या पतसंस्थाच्या एकूण अल्पमुदत कर्जात १९९ टक्के वाढ झाली.

२) १९७७-७८ या वर्षी पुरविलेल्या एकूण कर्जापैकी भात व इतर पिकांसाठी दिलेले कर्जाचे प्रमाण ३०.४३ टक्के होते तर ऊस कर्ज प्रमाण ६९.५७ टक्के होते. १९८४-८५ या वर्षी भात व इतर पिकांसाठी पुरविलेल्या कर्जाचे प्रमाण ३८.१९ टक्के व ऊसाचे कर्ज प्रमाण ६१.८१ टक्के झालेले असले तरी अल्पमुदत कर्जात ऊस कर्जाचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे.

३) या कालावधीत या पतसंस्थाच्या मध्यम मुदतीच्या कर्जात झालेली वाढ उल्लेखनीय आहे. प्राथमिक शेती पत पुरवठा संस्था मध्यम मुदतीची कर्जे विहीरी दुरुस्ती, यंत्र सामुग्री खरेदी, शेतीत सुधारणा, बैलगाडी इत्यादीसाठी देतात. अशी कर्जे कारखान्याच्या स्थापनेनंतर मोठया प्रमाणात देण्यात आलेली आहेत. कारखान्याच्या क्षेत्रातील या संस्थांनी खेळत्या भांडवलाची उलाढाल कारखान्याच्या स्थापनेचा अप्रत्यक्ष परिणाम मानावा लागतो.

९. कारखान्यांने राष्ट्रीय उत्पन्न निर्मितीला व निर्यातीला केलेली मदत

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्यामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रात विशेषत: चंदगड तालुक्यात आर्थिक विकासाला गती मिळाली त्याचप्रमाणे या

कारखान्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडण्याला मदत झाली व कारखान्याने केलेल्या साखर निर्यातीमुळे परकीय चलनही उपलब्ध होऊ शकले. कोष्टक १० मध्ये याबाबतची माहिती दिली आहे.

कोष्टक १०

दौलत शेतकरी साखर कारखान्याने उत्पादित केलेल्या साखर उत्पादनाची व केलेल्या निर्यात साखरेची किंमत

(रूपये)

| वर्ष | निर्यात साखरेचे मूल्य | उत्पादित साखरेची उत्पादन खर्चानुसार किंमत |
|---|---|---|
| १९७७-७८ | ३८,१०८ | २,७७,८२,५६० |
| १९७८-७९ | ५०,०१,७९३ | ६,३७,९८,३११ |
| १९७९-८० | ६५,४९,४७७ | ५,५१,८३,१६३ |
| १९८०-८१ | - | ८,१२,७३,४४९ |
| १९८१-८२ | ९३,३२,८५२ | १३,२४,०८,६५४ |
| १९८२-८३ | ४३,२३,७५७ | १०,६१,०९२११ |
| १९८३-८४ | १,०७,७६१३७ | ७,७८,७८,४९९ |
| १९८४-८५ | ३७,२४,५१२ | १५,२८,२९,५३४ |
| एकूण : | ३,९७,४६,६३६ | ७०,७२,६३,३८१ |

संदर्भ : दौलत शेतकरी सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल १९७७-७८ ते १९८४-८५

वरील कोष्टकावरून परकीय चलन मिळवून देण्यात कारखान्याने महत्वाचा वाटा उचलल्याचे दिसून येते. तसेच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये जादा राष्ट्रीय उत्पन्न निर्मितीला कारखान्याने लावलेला हातभार दिसून येतो.

१०. आर्थिक ताकद

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक ताकदीचा भाग म्हणून कारखान्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड विचारात घ्यावी लागेल कारण (कारखान्याच्या पोटनियमानुसार जोपर्यन्त महाराष्ट्र सरकारकडून घेतलेल्या भाग भांडवलाची पूर्ण फेड होत नाही तोपर्यन्त ६ टक्के लाभांश दिला जाईल.) अर्थात सहकारी साखर कारखान्याच्या भाग धारकांना मिळणारा लाभांश हा कायद्याने मर्यादित केलेला असतो. परंतु हा मर्यादित लाभांश सभासदांना उपलब्ध होणेही महत्वाचे आहे.

कारखान्याने भारताच्या औद्योगिक विकास महामंडळाकडून घेतलेले कर्ज कारखान्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीनंतर ७ वर्षांतच फेडले आहे. ही घटना असे दर्शविते की, कारखान्याने आपली कर्जे नियमितपणे वेळच्यावेळी व मुदतीच्या आधीच दिलेली आहेत. (औद्योगिक विकास महामंडळाचे कर्ज कोणताही साखर कारखाना प्रत्यक्ष कार्यवाहीत आल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून १२ हप्त्यात फेडण्याची तरतूद आहे.) डिसेंबर १९८५ अखेर कारखाना दीर्घ कर्जातून मुक्त झालेला आहे. यामुळे कारखान्याकडे जमा झालेल्या सभासदांच्या साधारणपणे ४ कोटी रुपये ठेवींचे भाग भांडवलात रूपांतर करणे कारखान्याला शक्य झाले आहे.

कोणत्याही साखर कारखान्याचे आर्थिक यश मोजत असताना कारखान्याने ऊस उत्पादकांना दिलेला दर महत्वाचा असतो. कारखान्याने, राज्य सरकारने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर दिल्यास त्यामुळे उत्पादन वाढीची प्रेरणा निर्माण होते तसेच सभासदांच्या लागवडी खालील क्षेत्रातही बदल होतो. दौलत शेतकरी साखर कारखान्याने उसाला दिलेला अंतिम दर व राज्य सरकारने ठरवून दिलेला दर (कोष्टक ११) मध्ये दिलेला आहे.

CARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## कोष्टक ११

### राज्य सरकारने व कारखान्याने दिलेला दर

| वर्ष | सरकारने ठरवून दिलेला दर | कारखान्याने दिलेला दर |
|---|---|---|
| १९७७-७८ | ११० | ११० |
| १९७८-७९ | १२६ | १२६ |
| १९७९-८० | १९९ | १९९ |
| १९८०-८१ | २५२ | २५२ |
| १९८१-८२ | २२३ | २२३ |
| १९८२-८३ | १७९ | २१२ |
| १९८३-८४ | २१९ | २१४ |
| १९८४-८५ | १६५ | ३०० |

संदर्भ : दौलत सहकारी साखर कारखाना, वार्षिक अहवाल, १९७७-७८ ते १९८४-८५

कोष्टक ११ चा विचार केल्यास १९८१-८२ पर्यन्त कारखान्याला सरकारने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर देणे जमलेले नाही. त्यानंतरच्या दोन वर्षांसाठी कारखान्याने सरकारने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर दिलेला आहे. म्हणजेच कारखान्यामुळे ऊस उत्पादकांना उत्पादन वाढीला प्रेरणा मिळू शकण्याजोगी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने मूळ प्रकल्पासाठी घेतलेल्या दीर्घकालीन कर्जाची परतफेड झाल्यामुळे कारखाना मद्यार्क शाळेसाठी आवश्यक असणारे ४ कोटी रुपये सभासदांच्या बिनपरतीच्या ठेवीतून उभारू शकला. या दृष्टीने कारखाना आर्थिक यशाच्या दिशेने वाटचाल करता आहे असे म्हणता येईल.

दौलत शेतकरी सहकारी साखर कारखान्याने, कारखान्याच्या स्थापने-मागची अनेक उद्दिष्टे साधण्याचा प्रयत्न केल्याचे आढळते. या प्रयत्नामुळे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील तीन तालुक्यांपैकी चंदगड तालुक्याच्या विकासाला विशेष चालना मिळाली आर्थिक कार्यक्रम प्रत्यक्ष सुरू करून अथवा महाराष्ट्र सरकार राबवत असलेल्या आर्थिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन कारखान्यांने आपल्या कार्यक्षेत्रात आर्थिक विकासाची सुरुवात केली.

पण अनेक उपक्रमांकडे कारखान्याचे अजून फारसे लक्ष गेलेले दिसत नाही. कृत्रिम पध्दतीने जनावरांची पैदास, त्यासाठी पैदास केंद्रे, दुग्ध व्यवसाय व कुक्कुट पालन या क्षेत्रात कारखान्याने कोणताच उपक्रम हाती घेतलेला नाही. कारखान्याकडे भाग विकास निधी व अन्य विकास निधीच्या रुपाने ऊस उत्पादकांच्याकडून भरपूर पैसा गोळा झालेला आहे. या पैशाचा गरजा लक्षात घेऊन नियोजित पध्दतीने व काळजीपूर्वक वापर केल्यास हा कारखाना भविष्यकाळात चंदगड तालुक्याच्या कायापालट करू शकेल.